*अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने बल्लारपूर शहराच्या 65.93 कोटी रू. किंमतीच्या पाणी पुरवठा प्रकल्पास मंजूरी*

====================================================================

अर्थमंत्री तथा चंद्रपूर जिल्हयाचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत बल्लारपूर शहराच्या 65.93 कोटी रू. किंमतीच्या पाणी पुरवठा प्रकल्पास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. राज्य शासनाच्या नगरविकास विभागाने दिनांक 1 नोव्हेंबर 2018 रोजी याबाबतचा शासन निर्णय निर्गमित केला आहे.

बल्लारपूर या जिल्हयातील प्रमुख औद्योगिक शहरात विकासाचे विविध प्रकल्प मंजूर करत शहराचा चेहरामोहरा बदलविण्यासाठी प्रयत्नरत असलेल्या अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नातुन बल्लारपूर शहराच्या पाणी पुरवठयाच्या प्रश्नावर या माध्यमातुन प्रभावी उपाययोजना होणार आहे. बल्लारपूर नगर परिषदेच्या सदर पाणी पुरवठा प्रकल्पाच्या योजनेची मंजूर किंमत रू.65.93 कोटी असून राज्य शासनामार्फत अनुज्ञेय अनुदान रू.59.337 कोटी इतके आहे तर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा सहभाग रू.6.593 कोटी इतका आहे. सदर प्रकल्पाचे कार्यान्वयन बल्लारपूर नगर परिषदेमार्फत करण्यात येणार असून सदर प्रकल्पास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्त करणे बंधनकारक राहणार आहे. कार्यादेशाच्या दिनांकापासून 18 महिन्याच्या कालावधीत प्रकल्प पूर्ण करणे बंधनकारक राहणार आहे.

बल्लारपूर शहरात 11 कोटी रू. किंमतीचे बस स्थानकाचे अत्याधुनिकीकरण, शहरात स्मार्ट पोलिस स्टेशनचे बांधकाम, उपविभागीय अधिकारी कार्यालयाचे बांधकाम, नाटयगृहाचे बांधकाम, डायमंड कटींग प्रशिक्षण केंद्र, शहरानजिक 27 कोटी रू. किंमतीचे स्टेडियमचे बांधकाम, बल्लारपूर शहरानजिक केंद्र सरकारच्या संरक्षण मंत्रालयाच्या माध्यमातुन 265 कोटी रू. किंमतीची सैनिकी शाळा, 7 कोटी रू. किंमतीची मुलींची डिजीटल शाळा अशी विविध विकासकामे मंजूर करत शहरात विकासाचा झंझावात निर्माण करणा-या अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने बल्लारपूर येथील रेल्वे स्थानक देशातील सर्वाधिक सुंदर रेल्वे स्थानक म्हणून पुरस्कारप्राप्त ठरले आहे.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत बल्लारपूर शहराच्या 65.93 कोटी रू. किंमतीच्या पाणी पुरवठा प्रकल्पास मिळालेली मंजूरी अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांचे फलीत असून या माध्यमातुन बल्लारपूर शहरातील पाणी पुरवठयाच्या प्रश्नावर प्रभावी उपाययोजना ठरणार आहे.